# पुणे विद्यापीठ

दुरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं.: - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे-४११००७
ई-मेल:- arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्रमांक:- आरक्षण/ओ-२२/६१२

दिनांक:- ०३/०६/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य / मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपध्दती.
संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन, पत्र क्रमांक.-अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दिनांक- ०९/०५/२०१३.
२. शासन परिपत्रक क्रमांक -अपंग-१९१३/प्र.क्र.५/१६-अ, दिनांक- १८/०४/२०१३.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रकास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अपंग-२००९/प्र.क्र.१३३/सुधार-३, दिनांक १४/०१/२०११ अन्वये अपंग व्यक्तींना अपंग आरक्षणाचे लाभ, फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र व इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र. १२७/२००३/१६-अ, दिनांक ०६/०५/२००४ मधील सूचना क्रमांक ६, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक अपंग-१९१३/प्र.क्र. ५/१६अ, दिनांक १८/०४/२०१३ अन्वये अधिक्रमित करण्यात आलेली आहे. (सोबत शासन परिपत्रकाची प्रत जोडत आहे)

सदर शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

३/६/१३

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत:- वरीलप्रमाणे

UNIVERSITY OF PUNE
(General Section)
17 MAY 2013
Inward No. 576

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ९.५.२०१३

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 21/05/2013 आवक क्र.- 715
विभाग -

प्रति,

**सर्व सहसचिव / उपसचिव,**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

विषय : **अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपद्धती...**

**महोदय,**

%

सोबत, सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन परिपत्रक क्रमांक अपंग-१११३/प्र.क्र. ५/ १६अ, दिनांक १८.४.२०१३ ची प्रत जोडली आहे.

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक क्रमांक अपंग-२००९/प्र.क्र. १३३/सुधार-३, दिनांक १४.१.२०११ अन्वये अपंग व्यक्तींना आरक्षणाचे लाभ, फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र व इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे,** शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र. १२७/२००३/१६-अ, दिनांक ६.५.२००४ अन्वये अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत विहीत करण्यात आलेल्या कार्यपद्धतीतील सूचना क्रमांक ६, सोबतच्या परिपत्रकान्वये अधिक्रमित करण्यात आले आहे.

सोबतचे शासन परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळविण्यात यावे व त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

**आपला,**

संशचौबळ

**( सं. श. चौबळ )**
**कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

प्रत त्वरित कार्यवाहीस्तव :

- संचालक, सर्व संचालनालये, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,
- सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलसचिव, महाराष्ट्र राज्य.

७२
८५/१३

कक्ष व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन : आस्था-2
दिनांक . २५/
बारव क्रमांक E-28910/2013

अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपध्दती निर्गमित करण्यात आलेले शासन परिपत्रक क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६.५.२००४ मधील सूचना क्रमांक ६ अधिक्रमीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:अपंग-१११३/प्र.क्र.५/१६-अ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ एप्रिल, २०१३.

वाचा --

१) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:अपंग-२००९/ प्र.क्र.१३३/सुधार-३, दि.१४ जानेवारी, २०११.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दि.६ मे, २००४.

प्रस्तावना -

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दि.६.५.२००४ अन्वये अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार अपंग व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती परिपत्रकातील सूचना क्रमांक ६ येथे विहित करण्यात आली आहे. सदरची सूचना खालील प्रमाणे आहे:-

"अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी. "

अपंग व्यक्तींना शासन सेवेचे लाभ तसेच उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनाच्या THE PERSONS WITH DISABILITIES (EQUAL OPPORTUNITIES, PROTECTION OF RIGHTS AND FULL PARTICIPATION) ACT, 1995 अन्वये तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यात सदर कायद्याची अंमलबजावणी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत करण्यात येते. त्या विभागाचे परिपत्रक क्रमांक अपंग-२००९/ प्र.क्र.१३३/ सुधार-३, दि.१४ जानेवारी, २०११ अन्वये अपंग व्यक्तींना आरक्षणाचे फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले

प्रमाणपत्र व इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकात निवड झालेल्या अपंग उमेदवाराची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती परिपत्रकातील सूचना क्रमांक ५ येथे विहित केली आहे. सदर सूचना क्रमांक ५ पुढील प्रमाणे आहे:-

"अपंग आरक्षणाचा फायदा घेऊन सदर प्रवर्गात निवड झालेल्या अपंग उमेदवाराची नियुक्तीपूर्वी वैद्यकीय तपासणी करताना नियुक्ती प्राधिकाऱ्याने संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्याला पत्राव्दारे स्पष्ट सूचना द्यावी की, सदर उमेदवाराची निवड अपंग आरक्षणाव्दारे अपंगांच्या अंध/अस्थिव्यंग/मूकबधिर प्रवर्गात झालेली आहे व त्या अनुषंगाने सदर उमेदवाराची वैद्यकीय तपासणी सर्वसाधारण निवड झालेल्या उमेदवारासारखीच करण्यात यावी. सदर उमेदवाराच्या अपंग प्रमाणपत्राच्या किंवा त्याच्या अपंगत्वाबाबत मुद्दे उपस्थित करु नयेत. शासनाने निर्धारीत केलेल्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या सर्व बाबी तपशिलवार तपासून दिल्यास नियुक्ती प्राधिकारी सदर व्यक्ती अपंग आरक्षणास पात्र आहे किंवा नाही याबाबत निर्णय घेईल. "

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केलेल्या उपरोक्त सूचना विचारात घेता या विभागाच्या दि.६.५.२००४ च्या परिपत्रकातील सूचना क्रमांक ६ ही आता कालबाह्य ठरते. त्यामुळे दि.६.५.२००४ च्या परिपत्रकातील सूचना क्रमांक ६ अधिक्रमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आता पुढील प्रमाणे सूचना/मार्गदर्शन करण्यात येत आहे:-

**शासन परिपत्रक:-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक क्रमांक अपंग-२००९/प्र.क्र.१३३/सुधार-३, दि.१४ जानेवारी, २०११ अन्वये अपंग व्यक्तींना आरक्षणाचे लाभ, फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र व इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. अपंग आरक्षणाचा फायदा घेऊन सदर प्रवर्गात निवड झालेल्या अपंग उमेदवाराची नियुक्तीपूर्वी वैद्यकीय तपासणीबाबत सदर परिपत्रकातील सूचना क्रमांक ५ येथे कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. त्यामुळे शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/ १६-अ, दि.६.५.२००४ अन्वये अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमधील सूचना क्रमांक ६ अधिक्रमित करण्यांत येत आहे.

या परिपत्रकातील सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानीत संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनाला आहेत अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. सदर सूचना प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४/१३/अ.क.२, दि.३० जानेवारी, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१३०४१८१३०२३५२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.रा.डिंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मा. मंत्री, मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय मूळ शाखा, मुंबई/औरंगाबाद/नागपूर,
*प्रबंधक,उच्च न्यायालय अपिल शाखा,मुंबई/औरंगाबाद/नागपूर,
*प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/औरंगाबाद/नागपूर,
*प्रबंधक,लोक आयुक्त व उपलोक आयुक्त,मुंबई
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
*सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधान भवन,मुंबई
*सचिव,राज्य निवडणूक आयोग,मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख
सर्व महानगर पालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/ नगरपालिका
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई
उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
आयुक्त,अपंग कल्याण, ३ चर्च रोड, पुणे.
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती/१६-अ
*पत्राने

अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत व
आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपद्धती

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. अपंग-१००३/ प्र.क्र.१२७/२००३/१६-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६/५/२००४.

वाचा :- १) केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,१९९५
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. २ मे, १९९८
३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि.४ मार्च, २००२.

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ मधील तरतूद क्र.३२ अनुसार शासकीय आस्थापनेमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील अशी पदे ठरवावयाची असून तरतूद क्र.३३ अनुसार अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात या अपंग प्रवर्गांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण तीन टक्के आरक्षण ठेवून अशा व्यक्तींच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. तथापि एखाद्या विभागातील /आस्थापनेतील कामाचे स्वरुप विचारात घेऊन व यासंबंधात कारणे स्पष्ट करून आरक्षण ठेवण्यापासून सूट देण्याबाबत आदेश निर्गमित करावयाचे आहेत. या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाने विभागांतर्गत व विभागांच्या अधिपत्याखालील गट अ, ब, क व ड मधील सर्व संवर्गातील कामाच्या स्वरूपाचा आढावा घेऊन अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत प्रस्ताव तयार करून, त्यास समाजकल्याण विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या मार्फत शासनाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्याच्या सूचना उपरोल्लेखित क्र.२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. उपरोल्लेखित क्र.३ च्या परिपत्रकान्वये आरक्षणानुसार नियुक्त्या करण्याबाबत क्रमवार बिंदु व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

अपंगांसाठी संवर्गानुसार आरक्षण ठेवण्याच्या व प्रत्येक पदासाठी १०० बिंदुची स्वतंत्र नोंदवही ठेवण्याच्या सूचना आहेत. बहुतांश कार्यालयांत पदे संख्येने अल्प असण्याची शक्यता असल्याने ३% आरक्षणानुसार पदांची परिगणना करणे कठीण आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार गट-क व गट-ड मधील पदांचा गटनिहाय एकत्रित विचार करून आरक्षण ठेवण्यासाठी पदांची परिगणना करावयाची आहे. तथापि गट-अ व गट-ब संबंधात अशी परिगणना संवर्गानुसार करावी अशा त्यांच्या सूचना आहेत. केंद्र शासनाच्या या पद्धतीचा विचार करून व त्यामध्ये राज्याच्या दृष्टीकोनातून बदल करून आरक्षित पदांच्या परिगणनेबाबत सुधारित पद्धती विहित करण्याचा विचार होता. या सुधारित पद्धतीमुळे एकाकी पद असले तरीही ते एकूण संख्येत विचारात घेतले जाणार असल्याने आरक्षणातून वगळले तरीही परिगणनेनुसार फरक पडणार नाही. तसेच आरक्षण ठेवण्याची व राबविण्याची प्रक्रिया केंद्रीभूत होणार असल्याने आरक्षण ठेवण्याच्या व त्यानुसार पदे भरण्याच्या प्रक्रियेस गती येऊन त्याचा कार्यपालन अहवालही लवकर मिळु शकेल. त्याचप्रमाणे आरक्षण ठेवण्याबाबत व त्यानुसार पदे भरण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शन व्हावे व त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे हा हेतुही आहे. हे विचारात घेऊन आता पुढील प्रमाणे तपशीलवार सूचना / मार्गदर्शन करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक :-**

अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाच्या आरक्षणाबाबत पुढील प्रमाणे एकत्रित मार्गदशनात्मक स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

१) अपंग व्यक्तींसाठी गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील पदांसाठी आरक्षण ठेवावयाचे आहे.

२) अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण सरळसेवेने करण्यात यावयाच्या नियुक्त्यांसाठी लागू आहे. (तथापि, सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि.५.३.२००२ अन्वये फक्त गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील व गट-क मधून गट-क

मधील पदांवरील पदोन्नतीसाठी हे आरक्षण लागू करण्यात आले आहे.)

३) सा.प्र.वि.परिपत्रक दि.१६.३.१९९९ अन्वये स्पष्ट करण्यात आल्यानुसार अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण समांतर आरक्षण (Horizontal Reservation) असून ते ५२% सामाजिक आरक्षण (व खुल्या प्रवर्गासाठी असलेले ४८% प्रमाण) यामध्ये कप्पीकृत/ अंतर्भूत (Interlocking) आहे.

४) सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि.४.३.२००२ अनुसार अपंग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणानुसार ठेवावयाची १०० रिक्त पदांची नोंदवही व नियुक्त्यांसाठी असलेली बिंदुनामावली या स्वतंत्र बाबी आहेत. तथापि अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांच्या नोंदवहीतील संबंधित क्रमांकानुसार अपंग उमेदवारांची मागणी करताना बिंदु नामावलीतील रिक्त बिंदुच्या प्रवर्गाच्या (मागासवर्गीय किंवा खुला) उमेदवाराची मागणी करावयाची आहे. तसेच केवळ अपंग व्यक्तींची मागणी करावयाची नसून अपंगांच्या कोणत्या प्रवर्गासाठी (अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात) मागणी आहे, हे ही स्पष्ट करावयाचे आहे.

५) अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी अपंगत्वाचे किमान प्रमाण ४०% असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियमात अपंग व्यक्तीची व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

"blindness" referes to a condition where a person suffers from any o following conditions namely :-

(i) total absence of sight ; or

( ii) visual acuity not exeeding 6/60 or 20/200(snellen) in the better eye with correcting lenses; or

(iii) limitation of the field of vision subtending an angle of 20 degree or worse;

"Person with low vision" means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refractive correction but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device;

" hearing impairment " means loss of sixty decibels or more in the better ear in the conversational range of frequencies.;

" locomotor disability" means disability of the bones, joints or muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy;

" cerebral palsy " means a group of non-progressive conditions of a person characterised by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occurring in the pre-natal, peri-natal or infant period of development;

केंद्र शासनाच्या अधिनियमातील वर उल्लेख केलेली व्याख्या व संबंधित पदावर अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाच्या आदेशात नमूद करण्यात आलेले अपंगत्वाचे प्रमाण / प्रकार विचारात घ्यावेत.

६) अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी.

७) सा.प्र.वि.शा.नि. दि.१६ जून, २००१ अन्वये अपंग व्यक्तींसाठी उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

८) अपंग व्यक्तीसाठी संबंधित जिल्ह्यांमधील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ञांचे प्रमाणपत्र आधारभूत धरावे.

## अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना

सा.प्र.वि. परिपत्रक दि.२ मे, १९९८ अन्वये प्रत्येक संवर्गात अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सा.प्र.वि. परिपत्रक दि.४ मार्च, २००२ अन्वये प्रत्येक पदासाठी १०० बिंदूंची स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यामधील १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि प्रत्येक संवर्गातील पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याच्या दृष्टिने आवश्यक त्या संख्येने उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे व केंद्र शासनाने गट-क व गट-ड मधील पदांसाठी विहित केलेली पद्धती विचारात घेऊन अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या **आरक्षणानुसार पदांची परिगणना करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून वर्षभरात सर्व गटात व सर्व संवर्गात उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांची माहिती मागवून १०० बिंदू नोंदवही ठेवावी. ही १०० बिंदू नोंदवही गट-अ, ब, क व ड अशी गटनिहाय ठेवावी. प्रत्येक गटाच्या नोंदवहीमध्ये त्या गटांतर्गत रिक्त होणाऱ्या सर्व संवर्गाचा / पदांचा समावेश करावा. रिक्त पदांमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील असे ठरवून (Identified) आरक्षण ठेवलेली व अपंग व्यक्ती काम करु शकणार नाहीत असे ठरविल्यामुळे (Non-identified) आरक्षण न ठेवलेली अशा दोन्ही प्रकारच्या पदांचा समावेश करावा. या नोंदवहीमधील क्रमांक १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी दर्शवावेत. या बिंदूंमधील एखादा बिंदू अपंग व्यक्तींसाठी अनारक्षित ठरविलेल्या पदाचा असेल तर अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठरविलेल्या पदाचा पुढील नजीकचा बिंदू विचारात घ्यावा. एकाकी पद असले तरीही ते या नोंदवहीमध्ये समाविष्ट करावे. मात्र आरक्षित करावयाचा बिंदु ठरविताना त्या बिंदुचा विचार न करता त्या पुढील नजीकच्या बिंदुचा विचार करावा. या सर्व रिक्त पदानुसार व अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार अपंग प्रवर्गनिहाय पदांची संख्या निश्चित करून त्यांचे नियुक्ती प्राधिकाऱ्यांमध्ये वाटप करावे. हे वाटप अपंगाच्या विविध प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविलेली पदे विचारात घेऊन अपंगांच्या अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात या तीनही प्रवर्गामध्ये शक्यतो समान होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी अपंगाच्या कोणत्याही प्रवर्गापासून आरक्षणाची सुरुवात करता येईल. तथापि हे करताना अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग/ मेंदूचा पक्षघात ही क्रमवारी ठेवण्यात यावी. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यानुसार अपंग उमेदवारांची मागणी करून /नियुक्त्यांच्या विहित पद्धतीचे पालन करून पात्र अपंग उमेदवारांच्या नियुक्त्या कराव्यात. विभाग प्रमुखांनी १०० रिक्त पदांच्या नोंदवही नुसार नियुक्त्या झाल्यानंतर पुन्हा नवीन नोंदवही तयार करावी. तसेच विभाग प्रमुखांनी या संबंधातील कार्यवाही पारदर्शक, निःपक्ष व तक्रारीस वाव राहु नये अशी असण्याबाबत पुरेपूर दक्षता घ्यावी.

मंत्रालयीन स्तरावरील आस्थापनेबाबत ही नोंदवही प्रशासकीय विभागांमध्ये ठेवण्यात यावी. महामंडळे, मंडळे यांच्याबाबत ही नोंदवही त्यांच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात यावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने भरण्यात येणाऱ्या मंत्रालयातील व बृहन्मुंबईतील समान संवर्गातील पदांबाबत ही नोंद वही सामान्य प्रशासन विभागामधील संबंधित कार्यासनांनी ठेवावी.

वरील पद्धतीमुळे संदर्भाधीन परिपत्रक क्र.२ व ३ मधील संवर्गानुसार आरक्षण व नोंदवही ठेवण्याबाबतच्या सूचना अधिक्रमित झाल्या आहेत असे समजावे. तसेच अपंग व्यक्तींच्या आरक्षणाबाबत व नियुक्त्यांबाबत वरील सूचनांच्या अनुषंगाने शंका उपस्थित झाल्यास त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय अंतिम समजावा. विशिष्ट पदावरील नियुक्तीबाबत जर तक्रारी / न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास ती संबंधित प्रशासकीय विभागांनी हाताळावीत. यासंबंधात आवश्यक असल्यास या विभागाशी सल्लामसलत करावी.

## अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा अनुशेष

अपंगाच्या ज्या विशिष्ट प्रवर्गाची मागणी करण्यात आली आहे, त्या प्रवर्गाचा उमेदवार एखाद्या भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूद क्र.३६ अनुसार हे पद पुढील भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवावयाचे आहे.

केंद्र शासनाच्या या संबंधातील धोरणानुसार हे आरक्षण तीन भरती वर्षांपर्यंत पुढे ओढावयाचे आहे. दरम्यानच्या कालावधीत अपंगांच्या तीनही प्रवर्गात आंतरबदल (Inter change) करून सुयोग्य उमेदवार उपलब्ध झाल्यास पद भरावयाचे आहे. असे करूनही सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास तिसऱ्या भरती वर्षानंतर ते पद आरक्षण मुक्त करून अपंग उमेदवाराव्यतिरिक्त उमेदवारातून पद भरावे.

या परिपत्रकातील सूचना शासकीय /निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानीत संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनाला आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. प्रशासकीय विभागांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निर्देशनास आणाव्यात.

हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि या आदेशाच्या दिनांकापूर्वी नियुक्त्यांची प्रक्रीया सुरू असेल त्यांस हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द.दा. देशपांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महापालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
आयुक्त, अपंग कल्याण, ३, चर्च रोड, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने

**अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५अन्वये अपंग व्यक्तीना अपंग आरक्षणाचे फायदे घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र व इतर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अपंग २००९/प्र.क्र. १३३/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : **१४ जानेवारी, २०११**

**वाचा :-** १)अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५.
२) केंद्र शासनाचे दि.२९/१२/२००५ चे ऑफिस मेमोरंडम.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र अपंग-२००६/ प्र.क्र.१०५/ सुधार-३, दि.३/११/२००६.
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र अपंग-२००६/ प्र.क्र.९/ सुधार-३, दि.२७/२/२००९
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र न्यायाप्र-२००९/प्र.क्र.९/ (भाग-१) सुधार-३, दि.२७/७/२००९
६) केंद्र शासनाचे दि.१०/६/२००९ चे ऑफिस मेमोरंडम.
७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र.न्यायप्र/२००६/ प्र.क्र.९/भाग-१, दिनाक १३.०८.२००९
८) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र.न्यायप्र/२००६/ प्र.क्र.९/भाग-१, दिनाक १३.०८.२००९
९) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र.न्याय प्र/२००९/ प्र.क्र.९ दिनाक ०३.०८.२०१०.
१०) जनहित याचिका क्रमांक १३९/२००६ व इतर.

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५ अन्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासनाच्या विविध विभागामार्फत अपंगांसाठीच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या विभागामार्फत समन्वयाचे काम केले जाते. अपंग आरक्षणाअंतर्गत शासन सेवेतील अपंग व्यक्तींसाठी राखीव पदे व त्याबाबतचा अनुशेष त्वरीत भरण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २९.१२.२००५ च्या ऑफीस मेमोरंडममध्ये नमूद करण्यात आलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या नमून्यात अपंगत्वाचे वैद्यकिय प्रमाणपत्र व संबंधीत मार्गदर्शक सूचना प्रसारित करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** केंद्र शासनाने दिनांक २९.१२.२००५ च्या मेमोरंडम मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपंगत्वाचे प्रमाणपत्र परिशिष्ठ अ मध्ये दिलेल्या सोबतच्या विहीत नमून्यातच देण्यात यावे व सदर प्रमाणपत्रच यापुढे अपंग आरक्षणाचे कोणतेही फायदे घेण्यासाठी ग्राह्य धरण्यात यावेत.

२. सदर प्रमाणपत्रावर वैद्यकीय मंडळाचे अध्यक्ष व दोन सदस्य अशा तीन अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या व शिक्का असणे आवश्यक आहे.

३. सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की, अपंगत्वाच्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या शब्दांव्यतिरिक्त इतर कोणतेही शब्द /अभिप्राय / वेगळे मुद्दे नमूद करण्यात येऊ नयेत.

४. सदर प्रमाणपत्र निर्गमित करताना जे अपंगत्वाचे प्रकार बरे होणारे आहेत (Curaeable) किंवा अपंगत्वाचे प्रमाण कालांतराने कमी होणारे असेल अशा उमेदवारांना त्यांनी किती वर्षानंतर आपल्या अपंगत्वाची तपासणी करून फेर प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे याबाबतची स्पष्ट सूचना प्रमाणपत्रामध्ये करण्यात यावी.

५. अपंग आरक्षणाचा फायदा घेऊन सदर प्रवर्गात निवड झालेल्या अपंग उमेदवारांची नियुक्तीपूर्वी वैद्यकीय तपासणी करताना नियुक्ती प्राधिकाऱ्याने संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्याला पत्राव्दारे स्पष्ट सूचना द्यावी की, सदर उमेदवाराची निवड अपंग आरक्षणाव्दारे अपंगांच्या अंध/अस्थिव्यंग/मूकबधिर प्रवर्गात झालेली आहे. व त्या अनुषंगाने सदर उमेदववाराची वैद्यकीय तपासणी सर्वसाधारण निवंड झालेल्या उमेदवारासारखीच करण्यात यावी. सदर उमेदवाराच्या अपंग प्रमाणपत्राच्या किंवा त्याच्या अपंगत्वाबाबत मुद्दे उपस्थित करू नयेत. शासनाने निर्धारीत केलेल्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या सर्व बाबी तपशिलवार तपासून दिल्यास नियुक्ती प्राधिकारी सदर व्यक्ती अपंग आरक्षणास पात्र आहे किंवा नाही याबाबत निर्णय घेईल.

६. यापूर्वी अपंग व्यक्तींना देण्यात आलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अपंग आरक्षण व अन्य बाबींसाठी ग्राह्य धरण्यात यावे. मात्र त्याचे नूतनीकरण करताना/गहाळ झाल्यानंतर नवीन निर्गमित करताना नवीन विहीत नमुन्यातच देण्यात यावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०११०११५१४२८२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सतीश गवई )
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :-
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्याचे सचिव,
मुख्य सचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव,

उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, (का. १६-अ), मंत्रालय, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक, आरोगय सेवा संचनालय,मुंबई, यांना कळविण्या येते की, सर्व शासकीय रुग्णालयाना व प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात यावे.
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
अधिष्ठाता, ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज, जे. जे. हॉस्पिटल, मुंबई,
निवड नस्ती-सुधार-३

ANNEXURE 1

NAME & ADDRESS OF THE INSTITUTE/ HOSPITAL

Certificate No. ________ Date:________

## DISABILTY CERTIFICATE

| Recent Photograph of the candidate showing the disability duly attested by the Chairperson of the Medical Board |
|---|

This is certified that Shri/Smt/Kum ____________________________________ son/wife/daughter of Shri ______________ age ______ sex ________ identification mark(s) ______________ is suffering from permanent disability of following category:

A Locomotor or cerebral palsy:

(i) BL – Both Legs affected but no arms.

(ii) BA – Both arms affected
- (a) Impaired reach
- (b) Weakness of grip

(iii) BLA – Both legs and both arms affected.

(iv) OL – One leg affected (right or left)
- (a) Impaired reach
- (b) Weakness of grip
- (c) Ataxic

(v) OA – One arm affected
- (a) Impaired reach
- (b) Weakness of grip
- (c) Ataxic

(vi) BH – Stiff back and hips (Cannot sit or stop)

(vii) MW – Muscular weakness and limited physical endurance.

B Blindness or Low Vision:

(i) B- Blind

(ii) PB – Partially Blind

C Hearing Impairment:

(i) D - Deaf

(ii) PD – Partially Deaf

(Delete the category whichever is not applicable)

2. This condition is progressive / Non- progressive / likely to improve / nor likely to improve. Reassessment of this case is not recommended / is recommended after a period of ____ years __- months.*

3. Percentage of disability in his / her case is ......... percent.

4. Shri / Smt / Kum,. _________ meets the following physical requirements for discharge of his/her duties:-

| | | |
|---|---|---|
| (i) | F-Can perform work by manipulating with fingers. | Yes/No |
| (ii) | PP – Can perform work by pulling and pushing . | Yes/No |
| (iii) | L - Can perform work by lifting. | Yes/No |
| (iv) | KC - Can perform work by kneeling and crouching. | Yes/No |
| (v) | B - Can perform work by bending. | Yes/No |
| (vi) | S - Can perform work by sitting. | Yes/No |
| (viii) | ST - Can perform work by standing. | Yes/No |
| (viii) | W - Can perform work by walking. | Yes/No |
| (ix) | SE - Can perform work by seeing. | Yes/No |
| (x) | H - Can perform work by hearing / speaking | Yes/No |
| (xi) | RW - Can perform work by reading and writing. | Yes/No |

(Dr. _______)
Member
Medical Board

(Dr. _______)
Member
Medical Board

(Dr. _______)
Member
Medical Board

Countersigned by the
Medical Superintendent/CMO/Head of
Hospital (with seal)

*Strike out which is not applicable.